सामना 20.12.25

असून, या निवडणुकीच्या प्रक्रियेसाठी सर्व तैनात करण्यात आली आहे.

# उमरी पोलिसांनी पकडली ३३ गोवंशांसह अन्य जनावरे

नांदेड, दि. १९ (प्रतिनिधी)- उमरी पोलिसांनी ३३ गोवंश, अन्य जनावरे व इतर साहित्य असा चार लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन संबंधितावर गुन्हा दाखल केला आहे.

काल रात्री उमरी पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार उमरी ते भोकर रस्त्यावर नवीन बायपास रोडने काही व्यक्ती गोवंश जातीची जनावरे विक्री करण्यासाठी घेऊन जात असल्याचा सुगावा लागला. त्यानुसार पोलीस निरीक्षक जयप्रकाश गुट्टे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उमरी ते भोकर रस्त्यावर जाणाऱ्या नवीन बायपास रोडवर छापा टाकला. मोकळ्या गायरानावर ही जनावरे विक्री करण्याच्या दृष्टीने झाडाला दोरीने बांधून ठेवली आहेत, असे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी सर्व बाबींची शहानिशा करुन नबी शादुल्ला शेख, रा. पहाडगल्ली, उमरी यावर कारवाई करून त्याच्या ताब्यात असलेले अवैध ३३ गोवंश व म्हैस जातीची जनावरे व अन्य साहित्य असा चार लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. संबंधितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरच्या कारवाईबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी उमरी पोलीस ठाण्याचे अभिनंदन केले आहे.



नांदेड : उमरी पोलिसांनी ३३ गोवंश, अन्य जनावरे व इतर साहित्य असा चार लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे.

# मुलीसह घरातून निघून गेलेली महिला सुखरूप कुटुंबाच्या स्वाधीन

कुंडलवाडी, दि. १९ (सा.वा.)- कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या अर्जापूर येथील ३० वर्षीय महिला व मुलगी ३० नोव्हेंबर रोजी रागाच्या भरात घरातून निघून गेल्या होत्या. या प्रकरणाचा सायबर सेलच्या मदतीने कुंडलवाडी पोलिसांनी१८ डिसेंबर रोजी एखलासपूर, ता. पंढरपूर येथून शोध लावून महिला व मुलीस सुखरूप कुटुंबाच्या स्वाधीन केले.

अर्जापूर येथील एक ३० वर्षीय महिला व मुलगी ३० नोव्हेंबर रोजी रागाच्या भरात घरातून निघून गेल्या होत्या. कुंडलवाडी पोलिसांनी सायबर सेल नांदेड यांच्याकडून तांत्रिक माहितीच्या आधाराने १८ डिसेंबर रोजी महिला व मुलीस एखलासपूर, जि. सोलापूर येथून ताब्यात घेतले. महिलेने कोणाविरुद्धही तक्रार नसल्याचे सांगितल्याने महिलेस आई-वडिलांच्या ताब्यात सुखरूप स्वाधीन करण्यात आले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर, सहायक पोलीस उपनिरीक्षक गफूर शेख, सायबर सेलचे राजेंद्र सिटीकर व पोलीस कर्मचारी आनंद बोडके यांचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.